Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४४ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

डॉ. बारेला यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यस्तरीय जबाबदारी

(पान २ वर)



» Selected

## मुंबईकरांच्या खिशाला मोठा झटका, CNG गॅसच्या दरात वाढ

मुंबई : मध्य-पूर्वेत सुरु असलेल्या संकटामुळं आंतरराष्ट्रीय निर्देशांकाशी संबंधित इंधन गॅसच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळं महानगर गॅस लिमिटेडचे (MGL) CNG च्या किंमतीत वाढ करण्याची घोषणा केली आहे. CNG ला मोठी मागणी आहे,. CNG विभागासाठी लागणारा बहुतेक गॅस आयात केलेल्या स्पॉट RLNG मधून पूर्ण केला जात आहे. वाढलेली CNG ची मागणी पूर्ण करण्यासाठी MGL ला आता जास्त दराने स्पॉट RLNG गॅस खरेदी करावा लागत आहे. गॅसच्या किंमतीत झालेल्या वाढीचा कंपनीकडून पुरवल्या जाणाऱ्या एकूण गॅसच्या खर्चावर मोठा परिणाम झाला आहे. वाढत्या इंधन गॅसच्या खर्चाची अंशतः भरपाई करण्यासाठी आणि ग्राहकांना CNG चा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, MGL ने सर्व GA मध्ये CNG च्या किमतीत प्रति किलो 2.0 रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

### उपचारांसह वैद्यकीय तपासणीलाही नकार, रक्तदाब आणि रक्तातील साखर कमी

# मनोज जरांगे पाटलांची प्रकृती खालावली!

## आरोग्य विभागाचे पथक परतले; मागण्या मान्य करण्यासाठी सरकारवर दबाव वाढला

**जन सम्राट टाईम्स**

**जालना । मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबत चिंताजनक माहिती समोर आली आहे. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी त्यांचा रक्तदाब (बीपी) आणि रक्तातील साखरेची पातळी कमी झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.**

त्यामुळे त्यांना वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मात्र, जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणी करून घेण्यासही नकार दिल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची माहिती मिळताच आरोग्य विभागाचे वैद्यकीय पथक अंतरवाली सराटी येथील आंदोलनस्थळी दाखल झाले. डॉक्टरांनी त्यांची तपासणी करण्याचा प्रयत्न केला; मात्र जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणीस सहकार्य करण्यास नकार दिला. त्यामुळे आरोग्य विभागाचे पथक तपासणी न करताच परतले. वैद्यकीय



अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उपोषणामुळे जरांगे पाटील यांच्या रक्तदाबासह रक्तातील साखरेची पातळी कमी झाली आहे. त्यांना उपचारांची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले असून, त्यांच्या प्रकृतीबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला आहे. मात्र, वैद्यकीय तपासणी आणि उपचार घेण्यास त्यांनी नकार दिल्याने पुढील परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, तसेच हैदराबाद गॅझेटच्या तरतुदीनुसार प्रमाणपत्र देण्यात यावे, या मागण्यांसाठी जरांगे पाटील यांनी पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे. आंदोलनाचा तिसरा दिवस असून, त्यांच्या समर्थनार्थ राज्याच्या विविध भागांतून मराठा समाजबांधव अंतरवाली सराटीकडे दाखल होत आहेत. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनीही जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत राज्य सरकारवर टीका केली. सरकार प्रत्येक वेळी नवीन शासन निर्णय काढून आंदोलन मागे घेण्यास भाग पाडते आणि त्यानंतर मागण्यांची पूर्तता होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला राज्यभरातून वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. विविध जिल्ह्यांतून मराठा समाजबांधव मिळेल त्या वाहनाने अंतरवाली सराटीकडे रवाना होत आहेत. विशेष म्हणजे, इचलकरंजी येथून एक मराठा समाजबांधव तब्बल ४८१ किलोमीटरचा सायकल प्रवास करून अंतरवाली सराटी येथे दाखल झाला. मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आपण सायकलवरून मुंबईपर्यंत जाणार असल्याचा निर्धार त्याने व्यक्त केला. त्यामुळे आंदोलनाला राज्यभरातून मिळणारा पाठिंबा आणि सरकारवरील दबाव दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे.

### सरकारच्या भूमिकेकडे लक्ष

जरांगे पाटील यांच्या प्रकृतीत झालेली घसरण आणि त्यांनी वैद्यकीय उपचार तसेच तपासणीस दिलेला नकार यामुळे आंदोलनाची परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यांच्या मागण्यांवर सरकारकडून काय भूमिका घेतली जाते, तसेच आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी पुढील काळात कोणती पावले उचलली जातात, याकडे मराठा समाजासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## गांजा शेतीचा पर्दाफाश; ८२.५० लाखांचा ३३० किलो अंमली पदार्थ जप्त

### कपाशी-तुरीच्या पिकात कॅनाबीसची लागवड; एक आरोपी ताब्यात, दुसरा पोलिसांच्या चाहुलीने पसार

**जन सम्राट टाईम्स**

**शिरपूर| प्रतिनिधी:** शिरपूर तालुक्यातील अतिदुर्गम चिलारे परिसरात वनविभागाच्या जमिनीवर कपाशी आणि तुरीच्या पिकामध्ये गांजा सदृश्य कॅनाबीस अंमली पदार्थाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार शिरपूर तालुका पोलिसांनी उघडकीस आणला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या कारवाईत तब्बल ३३० किलो कॅनाबीस गांजा सदृश्य अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत ८२ लाख ५० हजार रुपये आहे. या कारवाईमुळे अतिदुर्गम भागात सुरू असलेल्या बेकायदेशीर गांजा शेतीचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

गोपनीय माहितीवरून पोलिसांचा छापा पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, प्रभारी अधिकारी शिरपूर शहर पोलीस ठाणे यांना ३० ऑगस्ट २०२६ रोजी चिलारे परिसरात अंमली पदार्थाची लागवड केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी अतिदुर्गम भागातील वनविभागाच्या जमिनीवर छापा



टाकण्याची कारवाई केली. या कारवाईसाठी दोन शासकीय पंच, वजनकाटाधारक, फोटोग्राफर तसेच राजपत्रित अधिकाऱ्यांना सोबत घेण्यात आले. छाप्यादरम्यान कपाशी आणि तुरीच्या पिकामध्ये कॅनाबीस वनस्पतीची लागवड केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. ८२.५० लाखांचा मुद्देमाल जप्त पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ३३० किलो कॅनाबीस गांजा सदृश्य अंमली पदार्थ हस्तगत केला. या पदार्थाची किंमत प्रतिकिलो २५ हजार रुपये या प्रमाणे एकूण ८२ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. अंमली पदार्थ मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणारा असल्याने या बेकायदेशीर लागवडीची पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. एक आरोपी ताब्यात; दुसरा पसार या कारवाईदरम्यान दिपक अभिमान पावरा (वय ४२, रा. चितारे, पो. सुळे, ता. शिरपूर, जि. धुळे) याला पोलिसांनी घटनास्थळावरून ताब्यात घेतले. तर त्याच्यासोबत असलेला शिलदार कालुसिंग पावरा हा पोलिसांची चाहूल लागताच शेतातून पसार झाला. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल या प्रकरणी शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २४२/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमातील कलम ८(क), २०(अ)(i) व २८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनजमिनीवर अशाप्रकारे अंमली पदार्थाची लागवड करून त्याची तस्करी किंवा विक्री करण्याचा प्रयत्न केला जात होता का, यासह या प्रकारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

## फलटणच्या डॉक्टराच्या मृत्यूनंतर संतापाचा उद्रेक

**जन सम्राट टाईम्स**

**फलटण | प्रतिनिधी:** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र रुपनवर यांच्या मृत्यूनंतर फलटणसह माळशिरस तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दिवसांपूर्वी मुंबईतील सायन परिसरातील एका टॉवरवरून आत्महत्येचा प्रयत्न केल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान सोमवारी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर त्यांच्या नातेवाईकांनी आणि ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली असून, संबंधितांना तातडीने अटक न झाल्यास डॉ. रुपनवर यांच्या पार्थिवावर फलटण उपजिल्हा रुग्णालयासमोरच अंत्यसंस्कार करण्याचा इशारा दिल्याची माहिती समोर आली आहे. डॉ. रुपनवर यांच्या मृत्यूची बातमी समोर येताच त्यांच्या मूळ गावातील नागरिक मोठ्या संख्येने फलटणकडे रवाना झाले. नातेवाईक मुंबईहून पार्थिव घेऊन फलटणच्या दिशेने येत असल्याने शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि पोलिसांसमोर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. वैद्यकीय अधीक्षकांवर निलंबनाची कारवाई दरम्यान, डॉ. रुपनवर यांच्या मृत्यूप्रकरणी फलटण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीला मदने यांच्यावर निलंबनाची



कारवाई करण्यात आली आहे. डॉ. रुपनवर यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशी समिती नियुक्त केली होती. चौकशी समितीच्या अहवालानंतर डॉ. मदने यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. राजकीय दबावाचा आरोप डॉ. रुपनवर यांनी यापूर्वी काही व्यक्तींनी त्यांच्यावर राजकीय दबाव टाकून फिटनेस प्रमाणपत्र देण्याची मागणी केल्याचा गंभीर आरोप केला होता. प्रमाणपत्र देण्यास त्यांनी नकार दिल्यानंतर संबंधितांकडून शिवीगाळ आणि धक्काबुक्की करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता. याबाबत त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारही केली होती. मात्र, संबंधितांवर कारवाई होण्याऐवजी आपल्यावरच कारवाई करण्यात आल्याचा आरोप डॉ. रुपनवर यांनी केला होता. त्यांचे वेतन रोखण्यात आल्याने ते मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झाल्याचेही त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमधून समोर आले होते. 'न्याय मिळाला नाही तर आत्महत्या करणार' असा व्हिडिओ डॉ. रुपनवर यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ प्रसारित करून वरिष्ठांकडून होत असलेल्या कथित त्रासाबाबत भाष्य केले होते.

## अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडली!

**मुंबई** : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आरोग्याबाबत एक अत्यंत मोठी बातमी समोर येत आहे. अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील प्रसिद्ध बॉम्बे हॉस्पिटलच्या आयसीयू (ICU) मध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या डॉक्टरांचे एक विशेष पथक त्यांच्या आरोग्यावर बारीक लक्ष ठेवून असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू आहेत. अण्णा हजारे यांना गंभीर स्वरूपाचा संसर्ग (Severe Viral Infection) आणि डिहायड्रेशनचा म्हणजेच शरीरातील पाण्याचे प्रमाण प्रचंड कमी होण्याचा त्रास झाल्यानंतर त्यांना अधिक चांगल्या उपचारांसाठी तातडीने मुंबईत हलवण्यात आले आहे.

## टिटवाळ्यातील काळू नदीवरील धरणाला तातडीने मंजुरी द्या!

**जन सम्राट टाईम्स**

**टिटवाळा| प्रतिनिधी:** ठाणे जिल्ह्यातील झपाट्याने वाढणारे नागरीकरण आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, टिटवाळा येथील काळू नदीवरील प्रस्तावित धरण प्रकल्पाला तातडीने प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी जोरदार मागणी टिटवाळ्यातील नागरिकांनी केली आहे. या मागणीसाठी जिल्हा प्रशासनासह लोकप्रतिनिधींना सामूहिक जननिवेदन देण्यात आले असून, प्रकल्पासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून कालबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत नागरिकांच्या वतीने ठाणे निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर दंडाधिकारी डॉ. संदीप माने, जलसंपदा विभागाच्या उपअभियंता इंजिनिअर यामिनी मेश्राम, खासदार बाळ्या मामा म्हात्रे, आमदार विश्वनाथ भोईर तसेच केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांना सामूहिक जननिवेदन सादर करण्यात आले. वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याचा प्रश्न गंभीर निवेदनात नमूद केल्यानुसार, ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर, भिवंडी, कल्याण तालुक्यांसह टिटवाळा शहर आणि विविध ग्रामपंचायतींच्या परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे.



परिणामी लोकसंख्येत सातत्याने वाढ होत असून, भविष्यात पिण्याच्या पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्यापूर्वीच कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. लाखो नागरिकांना मिळणार दिलासा काळू नदीवरील प्रस्तावित धरण प्रकल्प पूर्ण झाल्यास केवळ टिटवाळा शहरालाच नव्हे, तर मुरबाड, शहापूर, भिवंडी, कल्याण तसेच ठाणे जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती, नगरपरिषद आणि महानगरपालिका क्षेत्रातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मोठी मदत होऊ शकते. त्यामुळे हा प्रकल्प केवळ टिटवाळ्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्याच्या भविष्यातील पाणी नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे नागरिकांनी निवेदनात स्पष्ट केले. फाईलपुरता विषय न ठेवता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करा धरण प्रकल्पाच्या कामाला अपेक्षित गती मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. हा महत्त्वाचा जनहिताचा विषय केवळ कागदोपत्री किंवा शासकीय फाईलपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीत आणण्याची गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले. प्रकल्पाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेऊन कामात होणारा विलंब टाळावा, अशी मागणीही करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## पाणी बॉटल 20 ला तर पेट्रोल फक्त 8 रुपयांना


### जगातील 'या' देशात मिळते पाण्यापेक्षाही स्वस्त पेट्रोल? जाणून घ्या सविस्तर माहिती

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** अमेरिका आणि इराण युद्धाचा जगातील अनेक देशांना फटका बसला होता. अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात इंधनाची टंचाई भासली होती. यामुळं पेट्रोलच्या दरात देखील वाढ झाली होती. आजही भारतात पेट्रोलचे दर (PETROL PRICE) 100 रुपयांच्या पुढे आहेत. याचा फटका सर्वसामान्य लोकांच्या खिशाला बसत आहे. दरम्यान, तुम्हाला जगात सर्वात स्वस्त पेट्रोल कोणत्या देशात मिळते? याबाबतची माहिती आहे का? तर इराणमध्ये जगातील सर्वात स्वस्त पेट्रोल मिळते. तिथे पाण्यापेक्षाही स्वस्त पेट्रोल मिळते. सध्या सोशल




मीडियावर इराणमधील एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामुळे तेथील पेट्रोलच्या किमती पाहून लोक थक्क झाले आहेत. भारतीय ट्रॅव्हल व्लॉगर गौरव शर्माने, त्याच्या @WANDER.DA या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून, या व्हिडिओद्वारे दाखवून दिले आहे की इराणमध्ये पेट्रोल पाण्याच्या बाटलीपेक्षा कित्येक पटीने स्वस्त आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, गौरव इराणमधील एका पेट्रोल पंपावर आपल्या गाडीत पेट्रोल भरताना दिसत आहे. तिथे पेट्रोल भरण्यासाठी एका विशेष 'फ्युएल कार्ड'ची आवश्यकता असते, जे त्याच्याकडे नव्हते. परिणामी, पंपावरील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्डचा वापर करून त्याच्या गाडीत 33 लिटर पेट्रोल भरले. जेव्हा पैसे देण्याची वेळ आली, तेव्हा एकूण बिल 50 लाख इराणी रियाल झाले. भारतीय चलनात रूपांतरित केल्यावर, ही रक्कम फक्त 270 रुपये होते. परिणामी, तिथे पेट्रोलची किंमत फक्त 8 रुपये प्रति लिटर आहे, जी बाजारात मिळणाऱ्या 20 रुपयांच्या पाण्याच्या बाटलीपेक्षा खूपच कमी आहे.व्लॉगरने आपल्या कॅप्शनमध्ये हे देखील नमूद केले आहे की, हे 8 रुपये प्रति लिटर पेट्रोलसुद्धा त्याच्यासाठी सर्वात महाग होते, कारण त्याच्या शेजारील पेट्रोल पंपांवर ते फक्त 3 रुपये आणि 2.5 रुपये प्रति लिटर दराने विकले जात होते. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोक मजेशीर प्रतिक्रिया देत आहेत. काही जण म्हणत आहेत की, आपल्या पूर्वजांच्या काळातही अशा किमती नव्हत्या, तर काही जण आठवण करून देत आहेत की इराण हा जगातील एक प्रमुख तेल उत्पादक देश आहे, त्यामुळेच तिथे किमती कमी आहेत. जगातील अनेक देशात पेट्रोलचे दर अधिक आहेत. त्यांना मोठा फटका बसत आहे. इराणमध्ये मात्र पेट्रोलचे दर खूपच कमी आहेत. कारण तिथे मोठ्या प्रमाणात इंधानाची निर्मिती होते. मोठ्या प्रमाणात खानी तिथे आहेत. अमेरिका आणि इराण युद्धाचा जगातील अनेक देशांना फटका बसला होता. अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात इंधनाची टंचाई भासली होती. यामुळं पेट्रोलच्या दरात देखील वाढ झाली होती. आजही भारतात पेट्रोलचे दर (PETROL PRICE) 100 रुपयांच्या पुढे आहेत. याचा फटका सर्वसामान्य लोकांच्या खिशाला बसत आहे.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ

संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# पथविक्रेत्यांना सन्मानाने व्यवसाय करू द्या; स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे

## पथविक्रेत्यांच्या हक्कांसह वीज ग्राहकांच्या विविध मागण्यांसाठी एल्गार

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** पथविक्रेत्यांना सन्मानाने व्यवसाय करण्याची संधी द्यावी तसेच ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती थांबवावी, यासह विविध मागण्यांसाठी बहुजन मुक्ती पार्टीच्या जळगाव जिल्हा शाखेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष पथविक्रेते आणि वीज ग्राहकांच्या विविध प्रश्नांकडे वेधण्यात आले.

नावाखाली पथविक्रेत्यांचा छळ थांबविण्याची मागणी जळगावसह राज्यातील अनेक पथविक्रेते रस्त्याच्या कडेला भाजीपाला, फळे व इतर वस्तू विकून उदरनिर्वाह करतात. मात्र अतिक्रमण विभाग व प्रशासनाकडून वारंवार कारवाई करून त्यांच्या मालाची नासधूस केली जाते तसेच माल जप्त केला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. पथविक्रेत्यांच्या जप्त केलेल्या मालाबाबत कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करून त्यांचा माल परत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. पथविक्रेत्यांना सन्मानजनक उपजीविकेपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. पथविक्रेता अधिनियम २०१४ आणि महाराष्ट्र नियम २०१५ यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण, अधिकृत प्रमाणपत्र आणि व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

"स्मार्ट मीटरची सक्ती नको"

वीज ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करण्यात येत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

स्मार्ट मीटरमुळे अवाजवी वीजबिले येत असल्याने नागरिकांमध्ये



नाराजी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. स्मार्ट मीटर आणि जुन्या डिजिटल मीटरची सहा महिने समांतर मोजणी करण्यात यावी, प्रत्यक्ष मीटर रीडिंगशिवाय अंदाजे वीजबिल देऊ नये तसेच ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसवू नये, अशी मागणी करण्यात आली. दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित झालेल्या कृषी व घरगुती ग्राहकांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली. आंदोलकांच्या प्रमुख मागण्या पथविक्रेता अधिनियम २०१४ व महाराष्ट्र नियम २०१५ यांची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करावी. ज्या पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यांचे तातडीने सर्वेक्षण करावे. पथविक्रेत्यांना व्यवसायाचे अधिकृत प्रमाणपत्र देण्यात यावे. पथविक्रेत्यांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करून सन्मानजनक उपजीविकेचा हक्क अबाधित ठेवावा. जप्त केलेला पथविक्रेत्यांचा माल त्यांना परत करण्यात यावा. पथविक्रेत्यांना व्यवसायासाठी अधिकृत जागा उपलब्ध करून द्यावी. ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करू नये. स्मार्ट मीटर व जुने डिजिटल मीटर सहा महिने समांतर मोजणीसाठी ठेवावेत. प्रत्यक्ष मीटर रीडिंगशिवाय अंदाजे वीजबिले देऊ नयेत. दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित झालेल्या कृषी व घरगुती ग्राहकांना नुकसानभरपाई द्यावी. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन आंदोलनानंतर बहुजन मुक्ती पार्टीचे जळगाव शहराध्यक्ष श्रुषी भारसके, उपाध्यक्ष राकेश भोई, जळगाव तालुका अध्यक्ष रविंद्र मोरे आणि भारत मुक्ती मोर्चाचे जळगाव जिल्हाध्यक्ष देवानंद निकम यांनी निवासी उपजिल्हाधिकारी चव्हाण यांना निवेदन सादर केले.या आंदोलनाचे नेतृत्व बहुजन मुक्ती पार्टीचे जळगाव जिल्हा युवा अध्यक्ष सुनिल देहडे आणि जिल्हा सचिव खुशाल सोनवणे यांनी केले.

आंदोलनात बहुजन मुक्ती पार्टीचे राज्य प्रभारी सुमित्र अहिरे, राष्ट्रीय ओबीसी मोर्चाचे प्रा. एन. व्ही. भारंबे, डॉ. मच्छिंद्र पाटील, अमोल कोल्हे, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे डॉ. शाकीर शेख, अकीलभाई कासार, अकील पहलवान, सावरकर रिक्षा युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीप सपकाळे यांच्यासह मोठ्या संख्येने पथविक्रेते, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मंत्रालयावर महामोर्चाचा इशारा पथविक्रेते आणि वीज ग्राहकांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. यापुढील टप्प्यात मंत्रालयावर लाखो पथविक्रेत्यांचा विशाल महामोर्चा काढण्यात येईल, असा इशारा बहुजन मुक्ती पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रभारी सुमित्र अहिरे आणि राज्य अध्यक्ष प्रतापदादा पाटील यांनी दिला.

# शेतातील १५ क्विंटल केळी चोरणारा मुख्य आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स

**फैजपूर | प्रतिनिधी:** फैजपूर परिसरातील आमोदा शिवारातील शेतातून तब्बल १५ क्विंटल केळीचे घड चोरून नेणाऱ्या गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपीला फैजपूर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. लहू अशोक केदारे (रा. लुंबिनीनगर, बामणोद, ता. यावल) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीच्या केळी विक्रीतून मिळालेल्या त्याच्या हिस्स्याची १५ हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. फैजपूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. शेतकऱ्याच्या ३० हजारांच्या केळीवर डल्ला त्रिमूर्ती चौक, फैजपूर येथील शेतकरी जितेंद्र दिनकर कोल्हे (वय ४५) यांनी आमोदा गावाच्या शिवारातील गट क्रमांक २०५ मध्ये केळीची लागवड केली होती. त्यांच्या शेतातील सुमारे ७० ते ८० केळीचे घड, एकूण १५ क्विंटल केळी, अंदाजे ३० हजार रुपये किमतीची, अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याप्रकरणी ४ जुलै २०२६ रोजी फैजपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सीसीटीव्ही आणि बँक व्यवहारातून आरोपींचा शोध गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच बँक व्यवहारांची माहिती तपासली. त्यातून लहू अशोक केदारे, अजय सुनील केदारे, शुभम विजय केदारे आणि सुरज मिलिंद मोरे (सर्व रा. लुंबिनीनगर, बामणोद, ता. यावल) यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील मुख्य सूत्रधार लहू केदारे हा गुन्हा केल्यानंतर फरार झाला होता. फैजपूर शहरात सापळा रचून अटक फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. आरोपी लहू केदारे हा २७ ऑगस्ट रोजी फैजपूर शहरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# डॉ. बारेला यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यस्तरीय जबाबदारी

## वंचितांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठावर मांडणार

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदी डॉ. चंद्रकांत बारेला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राज्यस्तरीय प्रवक्त्यांच्या नव्या यादीत त्यांचा समावेश करण्यात आला असून, पक्षाची भूमिका प्रभावीपणे माध्यमांसमोर मांडण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. डॉ. चंद्रकांत बारेला हे पक्षाच्या आदिवासी सेलचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत असून, आदिवासी समाज, ग्रामीण भागातील नागरिक, युवक आणि वंचित घटकांच्या विविध प्रश्नांवर ते सातत्याने काम करत आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील पार्श्वभूमीसोबतच सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या डॉ. बारेला यांनी जनतेच्या प्रश्नांना सातत्याने आवाज देण्याचे काम केले आहे. सामाजिक कार्य व संघटनात्मक अनुभव ठरणार उपयुक्त डॉ. बारेला यांच्या सामाजिक कार्याचा आणि संघटनात्मक अनुभवाचा पक्षाच्या राज्यस्तरीय मीडिया व जनसंपर्काच्या कामात उपयोग होणार आहे. विशेषतः आदिवासी, शेतकरी, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना राज्यस्तरावर प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी त्यांच्या नव्या भूमिकेतून पार पाडली जाणार आहे. "जनतेचा आवाज अधिक व्यापक व्यासपीठावर मांडणार" प्रवक्तेपदाची जबाबदारी स्वीकारताना डॉ. चंद्रकांत बारेला म्हणाले, "पक्षाने माझ्यावर सोपवलेली ही जबाबदारी माझ्यासाठी पद नसून जनतेचा आवाज अधिक व्यापक पातळीवर



मांडण्याची संधी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाची विचारधारा, भूमिका आणि जनतेशी संबंधित प्रश्न राज्याच्या प्रत्येक व्यासपीठावर ठामपणे मांडण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करेन. विशेषतः आदिवासी, शेतकरी, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी माझे प्रयत्न राहतील." महाराष्ट्रातील सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये, लोकशाही, रोजगार, शिक्षण, आरोग्य, युवक, शेतकरी आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर पक्षाची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही डॉ. बारेला यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांकडून अभिनंदन डॉ. चंद्रकांत बारेला यांच्या नियुक्तीबद्दल पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदी डॉ. चंद्रकांत बारेला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राज्यस्तरीय प्रवक्त्यांच्या नव्या यादीत त्यांचा समावेश करण्यात आला असून, पक्षाची भूमिका प्रभावीपणे माध्यमांसमोर मांडण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

# नालंदा बुद्ध विहारात वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे आठवे पुष्प संपन्न

## 'डॉ. आंबेडकर यांचे क्रांतीलढे' विषयावर वाघ यांचे प्रबोधन

जन सम्राट टाईम्स

**शिरसोली, ता. जळगाव । प्रतिनिधी:** नालंदा बुद्ध विहार, जळके रोड, शिरसोली येथे भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे आठवे पुष्प उत्साहपूर्ण व धम्ममय वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व लेखक आयु. बाबूराव वाघ (जळगाव) यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीलढे' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा इतिहास आणि विचार अत्यंत सोप्या व समजेल अशा भाषेत उपस्थितांसमोर मांडत प्रभावी प्रबोधन केले. मान्यवर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमास आयु. डॉ. सचिन नरवाडे (जिल्हा संरक्षण सचिव), आद. ज्योतीताई भालेराव (केंद्रीय



शिक्षिका), आद. सुषमाताई इंगळे (जिल्हा कार्यालयीन सचिव), आद. शीतलताई भगत, आयु. राजेश इंगळे (तालुका अध्यक्ष, जळगाव), आद. यशवंत जाधव (तालुका कोषाध्यक्ष), आद. अनिलदादा भगत, आद. शैलेश सोनवणे (तालुका संरक्षण सचिव), आद. सुनिल तायडे, आद. पंडित वानखेडे (तालुका पर्यटन सचिव) यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. शिरसोली ग्रामशाखेचे अध्यक्ष आद. सुनिल तायडे व त्यांची संपूर्ण कार्यकारणी तसेच परिसरातील श्रद्धाशील बौद्ध उपासक-उपासिका, बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. बोधीवृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश या मंगल प्रसंगी आद. डॉ. सचिन नरवाडे यांनी नालंदा बुद्ध विहार परिसरात लागवडीसाठी बोधीवृक्ष देऊन दान पारमिता पूर्ण केली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बोधीवृक्षाची लागवड करण्यात आली. या उपक्रमातून धम्मविचारांसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. पंडित वानखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयु. शैलेश सोनवणे यांनी मानले. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वर्षावास प्रवचन मालिकेचे आठवे पुष्प प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले.

# राखीचा धागा मायेचा; 'विशेष' भगिनींना GPS परिवाराचा आपुलकीचा आधार

## अनाथ भगिनींसोबत 'अतूट धागा मायेचा' रक्षाबंधन सोहळा

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/जळगाव | प्रतिनिधी:** रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणीच्या नात्याचा उत्सव. प्रेम, विश्वास, आपुलकी आणि आयुष्यभर एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याचा भावनिक धागा या सणातून अधिक घट्ट होतो. याच नात्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत पाळधी येथे अंध, दिव्यांग व अनाथ भगिनींसोबत GPS मित्र परिवाराच्या वतीने 'अतूट धागा मायेचा' हा आगळावेगळा रक्षाबंधन सोहळा भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मायेच्या नात्यापासून कोणीही वंचित राहू नये, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाने रक्षाबंधनाच्या सणाला माणुसकीचा नवा अर्थ दिला. सामाजिक बांधिलकीला रक्षाबंधनाची भावनिक जोड राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रतापराव पाटील यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वाखाली GPS मित्र परिवाराच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक व समाजोपयोगी उपक्रम राबविले



जातात. गरजू आणि वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याच्या याच सेवाभावी परंपरेतून या विशेष रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सोहळ्यात अंध, दिव्यांग व अनाथ भगिनींना सन्मानाने सहभागी करून घेत त्यांच्या आनंदात GPS परिवार सहभागी झाला. भगिनींनी परिवारातील भावांच्या मनगटावर राखी बांधून औक्षण केले. या भावनिक क्षणी रक्ताच्या नात्यापलीकडील माया, स्नेह आणि आपुलकीचे नाते निर्माण झाले. भगिनींच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद आणि उपस्थितांच्या डोळ्यांत दाटलेले भाव यामुळे सोहळ्याला अधिक हृदयस्पर्शी वातावरण लाभले. त्यांच्या सुख-दुःखात तसेच गरजेच्या प्रत्येक प्रसंगी GPS परिवार त्यांच्या पाठीशी उभा राहील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली. आरोग्यापासून रोजगारापर्यंत समाजसेवेची वाटचाल GPS मित्र परिवाराच्या माध्यमातून आरोग्य व नेत्रतपासणी शिबिरे, मोतीबिंदू शस्त्रक्रियांसाठी मदत, रक्तदान, गरजू कुटुंबांना सहाय्य, युवकांसाठी रोजगारविषयक उपक्रम तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रम सातत्याने राबविले जात आहेत. याच सामाजिक जाणिवेला रक्षाबंधनाच्या पवित्र नात्याची जोड या उपक्रमातून मिळाली. 'राखी केवळ मनगटावरची नव्हे, माणुसकीच्या नात्याची...' 'राखी केवळ मनगटावर बांधली जात नाही; ती माणसाला माणसाशी जोडते,' याची जिवंत अनुभूती या सोहळ्यात आली. समाजातील विशेष गरजा असलेल्या भगिनींसोबत सणाचा आनंद वाटून घेत GPS मित्र व मैत्रीण परिवाराने राखीचा धागा हा केवळ परंपरेचा भाग नसून माया, स्नेह, विश्वास आणि आधाराचे नाते घट्ट करणारा धागा असल्याचा संदेश दिला.

# निंबायतीत ग्रामसभा; प्रश्नांना उत्तरे न देता अधिकारी निघून गेल्याने गोंधळ

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यातील निंबायती येथे सोमवारी (३१ ऑगस्ट) झालेली ग्रामसभा नागरिकांच्या विविध प्रश्नांमुळे चांगलीच वादळी ठरली. पाणीपुरवठा, रस्ते, घरकुल योजना, निधी खर्च यासह विविध विकासकामांबाबत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र, नागरिकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता संबंधित अधिकारी सभेतून निघून गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या प्रकारामुळे ग्रामसभेत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. निंबायती येथील ग्रामसभा यापूर्वी २० ऑगस्ट रोजी तहकूब करण्यात आली होती. त्यानंतर ही सभा ३१ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी विस्तार अधिकारी अशोक दौड होते. प्रश्नांचा भडिमार; समाधानकारक उत्तरे नसल्याचा आरोप ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी गावातील पाणीपुरवठ्याची समस्या, रस्त्यांची दुरवस्था, घरकुल योजनांची अंमलबजावणी तसेच ग्रामपंचायतीच्या निधीच्या खर्चाबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्ट माहिती आणि समाधानकारक उत्तरे मिळावीत, अशी मागणी केली. मात्र, नागरिकांच्या प्रश्नांना अपेक्षित उत्तरे न देता काही अधिकारी सभेतून निघून गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली. अधिकाऱ्यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न अधिकारी सभास्थळावरून निघून जात असल्याचे लक्षात आल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी त्यांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दस्ती पोलीस निरीक्षक गोरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत शांतता राखण्याचे आवाहन केले. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. ग्रामसभेच्या गांभीर्यावर प्रश्नचिन्ह ग्रामसभेत नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रशासनाकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत आणि अधिकारी सभेतून निघून गेल्याचा आरोप झाल्याने ग्रामसभेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# NSS माजी विद्यार्थी गेट-टुगेदर २०२६ उत्साहात संपन्न



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या NSS माजी विद्यार्थी स्नेहमेळावा व गेट-टुगेदर २०२६ चे दुसरे वर्ष पाचगणी-महाबळेश्वर येथे उत्साहपूर्ण वातावरणात दिमाखात संपन्न झाले. या कार्यक्रमाला NSS चे १५ स्वयंसेवक आणि १० महिला स्वयंसेविका उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी योगगुरू डॉ. भालचंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली योगसत्राने झाली. त्यानंतर पाचगणी नगरपरिषद आणि Nestlé प्रणित 'हिलदरी' अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मुकेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध सिडनी पॉईंट परिसरात श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत १५० किलोपेक्षा अधिक कचरा संकलित केला. या माध्यमातून 'स्वच्छ पाचगणी, सुंदर पाचगणी' असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत वाढवली दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम, स्वयंसेवकांचा सत्कार आणि उपस्थितांचे मनोगत यांचे आयोजन करण्यात आले. विविध कलाविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते शेरो-शायरी सादर करणारे 'बेताब बादशहा' दिलशाद शेख आणि मनमोहक अदाकारीने उपस्थितांची मने जिंकणारी नृत्यांगना 'धकधक गर्ल' कांचन पडळकर (ऐश्वर्या). कांचन पडळकर यांनी शिबिरात उत्कृष्ट व कलात्मक नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. याशिवाय छोटा स्वयंसेवक आर्तुरुल गाझी हा देखील कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरला. नियोजन समितीचे योगदान कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष नियोजन समिती गठित करण्यात आली होती. समितीच्या अध्यक्षपदी सय्यद मुश्ताक, उपाध्यक्षपदी सुबोधकुमार पाटील, खजिनदारपदी विनायक महाजन, सल्लागार म्हणून डॉ. मुकेश कुलकर्णी, तर महिला अध्यक्षा म्हणून मनिषा मानकर यांनी जबाबदारी सांभाळली. सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी परिश्रम घेत स्नेहमेळावा यशस्वी केला. कार्यक्रमाच्या शेवटी विनायक महाजन यांनी आभार प्रदर्शन केले. माजी विद्यार्थी, स्वयंसेवक आणि महिला स्वयंसेविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गेट-टुगेदर २०२६ च्या दुसऱ्या पर्वाला विशेष रंगत प्राप्त झाली.

# उज्जैनला गेले कुटुंब अन् चोरट्यांचा घरावर डल्ला; 24 तासांत दोघे जेरबंद

## रामेश्वर कॉलनीतील ३१ लाखांच्या घरफोडीचा एमआयडीसी पोलिसांकडून छडा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** कुटुंबीय उज्जैन येथे दर्शनासाठी गेले असल्याची संधी साधून रामेश्वर कॉलनीतील बंद घराचे कुलूप तोडून लाखो रुपयांचे दागिने लंपास करणाऱ्या दोन आरोपींना एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. पोलिसांनी आरोपींकडून ३१ लाख २६ हजार ८०० रुपये किमतीचे २०८ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि २८ ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत. गंभीर घरफोडीच्या गुन्ह्याचा जलदगतीने तपास करून मोठ्या प्रमाणातील चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. कुटुंब उज्जैनला, चोरट्यांनी साधली संधी रामेश्वर कॉलनीतील रहिवासी संगीता घुगे या कुटुंबासह उज्जैन, मध्य प्रदेश येथे दर्शनासाठी गेल्या होत्या.

घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी २७ ऑगस्ट रोजी रात्री ३.३० ते २८ ऑगस्ट रोजी रात्री ३.३० या कालावधीत घराच्या दरवाज्याची कडी-कॉयंडा तोडून आत प्रवेश केला.चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. घुगे कुटुंबीय परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस



ठाण्यात गुन्हा क्रमांक ६९७/२०२६ दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(ए), ३३१(३) आणि ३३१(४) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.त्यानुसार पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून महत्त्वाचे पुरावे संकलित केले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेण्यात आला. तपासाची चक्रे वेगाने फिरल्यानंतर पोलिसांनी विशाल मुरलीधर दाभाडे (वय २५, व्यवसाय मजुरी) आणि जितेंद्र मुरलीधर दाभाडे (वय २७), दोघेही रा. सप्तश्रृंगी माता मंदिराजवळ, रामेश्वर कॉलनी, जळगाव, यांना ताब्यात घेतले. चौकशीत धागा मिळताच लाखोंचा मुद्देमाल जप्त दोन्ही संशयितांकडे कसून चौकशी केल्यानंतर घरफोडीच्या गुन्ह्याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली. त्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. जप्त मुद्देमालात सोन्याचे गंठन, मिनी पाटली, फॅन्सी शॉर्ट पाटली, काळेमणी पाटली, टॉप्स, विविध डिझाइनच्या अंगठ्या, नथ तसेच चांदीचे जोडवे यांचा समावेश आहे. पोलिसांनी एकूण ३१ लाख २६ हजार ८०० रुपये किमतीचे २०८ ग्रॅम सोने आणि २८ ग्रॅम चांदी हस्तगत केली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची उल्लेखनीय कामगिरी ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि जळगाव उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक विजयसिंग पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल रामकृष्ण पाटील, रमेश चौधरी, किरण चौधरी, पोलीस नाईक प्रदीप चौधरी, तसेच पोलीस कॉन्स्टेबल रमाकांत साळुंखे, नितीन ठाकूर, राहुल घेटे, गणेश टेकर, किरण पाटील, शशिकांत मराठ, ललित नारखेडे, विशाल कोळी, योगी घुगे आणि सुभाष साबळे यांनी कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# भगवा चौकातील शिवसेना ठाकरे गटाचे कार्यालय अखेर हटवले

## ॲड. पंकज गोरे यांचा पुढाकार; "कार्यालय काढले, आता अवैध धंद्यांविरोधात हिंदू युवा सेना आंदोलन करणार का?

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** धुळे शहरातील बहुचर्चित असलेले भगवा चौक येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यालय एडवोकेट पंकज गोरे यांनी स्वतः पुढाकार घेत काढून घेतले असून या कार्यालयाच्या काढण्यासाठी मागणी करणारी भाजपा पुरस्कृत रजिस्टर नसलेली तथाकथित हिंदू युवा सेना आता अवैध धंद्याविरोधात आवाज उठवेल का किंवा त्यांचे नेते यावर आंदोलनाला बसतील का? असा सवाल देखील त्यांनी आता उपस्थित केला आहे. धुळे शहरातील विविध राजकीय पक्षांचे कार्यालय हे अतिक्रमित असल्याचा आरोप करीत भाजपा पुरस्कृत हिंदू युवा सेनेच्या वतीने गेल्या काही दिवसांपूर्वी बेकायदेशीर भर रस्त्यात स्टेज टाकून आंदोलन करण्यात आले होते. याजागी दुसऱ्या पक्षाचे पदाधिकारी किंवा सामान्य धुळेकर असते तर पोलीस प्रशासनाने लागलीच त्याच मिनिटाला ते आंदोलन उधळून सबंधितांवर गुन्हे दाखल केले असते परंतु तसे झाले नाही. भाजपा पुरस्कृत संघटनेला आंदोलन करण्यासाठी आश्रय देण्यात आला. या दरम्यान दोन कार्यालय नुकतीच दोन दिवसांपूर्वी उभी राहिली होती ती काढण्याची व ४० वर्ष जुने असलेले शहरातील भगवा चौक येथील शिवसेनेचे कार्यालय देखील अतिक्रमित असल्याचा आरोप करण्यात आला होता,

हे कार्यालय काढण्याची मागणी देखील भाजपा पुरस्कृत हिंदू युवा सेनेने मनपा प्रशासनाकडे केली होती. हे कार्यालय काढून घेण्याची नोटीस महानगरपालिकेने दिली होती. या नोटीसीला एडवोकेट पंकज गोरे यांनी उत्तर देत दहीहंडी उत्सव आणि गणेश उत्सव पूर्ण साजरे झाल्यानंतर सदरचे कार्यालय काढून घेण्यात येईल कारण दहीहंडी उत्सव व गणेश उत्सव जल्लोषात साजरा ह्याच कार्यालयाच्या माध्यमातून साजरा करण्यात येत असतो. या दरम्यान दही हंडी पथक अथवा गणेशोत्सवात भक्तांना कोणतीही इजा झाल्यास तात्पुरता स्वरुपात उपचारासाठी हे कार्यालय उपयोगी पडेल असे एडवोकेट पंकज गोरे यांच्या वतीने मनपा प्रशासनाला कळविण्यात आले होते. मात्र त्यानंतर टपरी धारक व रोडगाडी धारक यांच्यावर प्रशासनातर्फे एककलमी कार्यवाहीचा धडाका सुरू झाला.

ज्या टपऱ्या किंवा रोडगाडी खरच वाहतुकीला अडथळा आहे ते काढले असते तर समजू शकतो परंतु सरसकट सर्व टपऱ्या व रोडगाडी धारकांवर कार्यवाही करणे म्हणजे ही राक्षसी कार्यवाही झाली. यासंदर्भात वेगवेगळे व्यावसायिक टपरी धारक आम्हाला भेटून जात होते मदत करा आम्ही आमचा उदरनिर्वाह कसा करायचा? असे प्रश्न आम्हाला विचारू लागले त्याच दरम्यान त्यांनी आवर्जून सट्टा पिढ्यांचा उल्लेख



केला ते अतिक्रमण मध्ये असतांना त्यांच्यावर कोणतीही कारवाई नाही आणि आम्हा कष्टकऱ्यांवरच कारवाई का? आम्ही धुळ्यात राहायचे नाही का? असा देखील प्रश्न त्यांनी मला केला. तेव्हा मी त्यांना आश्वासित केले आणि सांगितले की गेल्या तीन महिन्यांपासून अवैध धंदे बंद करा परंतु कारवाई आणखी झालेली नाही. आता तुम्ही आलाच आहे तर तुमच्या वरील कारवाई थांबवण्यासाठी लढतो. तेव्हा पासून प्रशासनाला पत्र लिहितोय की टपरी धारक व रोडगाडी धारक यांच्यावरील कारवाई थांबवा व अवैध धंद्यांवर कारवाई करा. अन्यथा आंदोलन उपोषणाला बसेल हा इशारा देखील दिला. तरीही कार्यवाही सुरूच होती त्यामुळे अवैध धंदे तात्काळ बंद करण्याच्या मागणीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले. सदरचे आंदोलन सुरू झाल्यानंतर भाजप पुरस्कृत हिंदू युवा सेनेने गैरसमज पसरविण्याचे काम केले त्यात त्यांची ही चूक नाही त्यांनी महानगरपालिकेतून माहिती घेऊन नोटिशीला दिलेले उत्तर वाचले असते तर त्यांच्या कीळसवान्या अभ्यास नसलेल्या बुद्धीचा प्रचार प्रसार केला नसता.

युवा सेना किंवा त्यांचे नेते आता टपरी धारकांवर होणाऱ्या अन्याया विरुद्ध तसेच अवैध धंद्यांविरोधात आंदोलन करेल का? किंवा या अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्याची मागणी करेल का? किंवा अवैध धंद्याविरोधात पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन तत्काळ कारवाई करण्याची मागणी करेल का? असा सवाल ॲड.पंकज गोरे यांनी उपस्थित केला आहे. आता कार्यालय नाही तरी पण आम्ही आमच्या मागणीवर ठाम असून अवैध काळे धंदे तत्काळ बंद करा व अतिक्रमण मोहीम थांबवून जे टपरी धारक अथवा रोडगाडी धारक कोणत्याही वाहतुकीला नडत नसतील त्यांच्यावर कारवाई न करता येणाऱ्या हिंदूंचे सण उत्सव आपल्या हिंदू बांधवांना जे स्व-कष्टाने दोन पैसे कमवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो त्याला सण उत्सव करू द्या. आगामी काळात दही हंडी अथवा गणेशोत्सव नसता तर महानगरपालिकेची नोटिस आल्याच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही कार्यालय काढून घेतले असते पण सण तोंडावर आल्याने आम्हाला मागील सणांचा अनुभव असल्याने दही हंडी पथकातील युवती असू द्या किंवा गणेशोत्सव असू द्या या दरम्यान भाविकांना येणारा अपघाती त्रास त्यांच्या सोयी साठी वेळ मागितली होती.

मात्र विरोधकांनी अवैध धंद्याविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाचा संबंध कार्यालयाशी जोडला असल्याचे सांगत ॲड.पंकज गोरे यांनी विरोधकांचा आरोप फेटाळून लावला आहे. तसे पण आज पर्यंत धुळे जिल्ह्यातील अथवा शहरातील कोणत्याही सामान्य नागरिकांनी कधी कार्यालयाबाबत तक्रार केली नाही. कारण या कार्यालयाच्या माध्यमातून अनेक जन-सामान्यांना मदतीचा हात दिला जातो हे माहिती आहे. फक्त राजकिय द्वेषापोटी तक्रार करणारी भाजप हे विसरली याच कार्यालयाच्या आशीर्वादाने तुमचे सुरवातीला दोन-तीन नगरसेवक निवडून यायचे. आज भाजप मधील बरीच मंडळी अशी आहे ज्यांची राजकीय कारकीर्द इथूनच सुरू झाली. बाकी तर कित्येक नगरसेवक ज्यांनी AB फॉर्म ह्याच कार्यालयातून घेतला आणि नगरसेवक झाले. तेव्हा त्यांना हे कार्यालय अतिक्रमित आहे असे वाटले नाही. पण असो वेळ काळ बदलतो माणूस बदलतो त्यानुसार प्रवृत्ती बदलते. विरोधकांना जे हवे आहे ते आम्ही देणार नाही. शहराचे वातावरण त्यांना खराब करायचे ते आम्ही होऊ देणार नाही. विरोधकांनी केलेले आरोप सर्व खोटे आहेत ह्या साठी आम्ही महानगरपालिकेचे आम्ही मागितलेल्या वेळेला उत्तर येण्या आधीच एडवोकेट पंकज गोरे यांनी स्वतः कार्यालय काढून घेतले आहे. आम्ही शिवसैनिक ज्या रस्त्यावर उभे राहतो तिथेच आमचे कार्यालय सुरू होत असते कारण आम्ही कुठेही कार्यक्रमाला गेलो, लग्नांना,पूजन, सुखा-दुःखात, हॉस्पिटल-शाळा-महाविद्यालय, शासकीय कार्यालय कुठेही गेलो आणि सामान्य जनतेला दिसलो तर त्यांच्या असलेल्या अडचणी आमच्यापर्यंत ते मांडतातच त्यामुळे कार्यालय असेल तरच सामान्य जनता आमच्या पर्यंत पोहोचेल असे काही नाही.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## बॅनरवर नगराध्यक्षांचा फोटो गायब; काँग्रेसमधील धुसफूस चव्हाट्यावर!

### "फोटो गायब की मनोमिलन?"




जन सम्राट टाईम्स

**मलकापूर | प्रतिनिधी :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बंटीदादा सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त मलकापूर शहरात लावण्यात आलेल्या बॅनरवर लोकनियुक्त नगराध्यक्षांचा फोटो नसल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छांसाठी लावलेल्या एका बॅनरनेच मलकापूर काँग्रेसमधील कथित अंतर्गत धुसफूस पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणली आहे. गत निवडणुकीपासून काँग्रेसमध्ये गटबाजी असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच नव्या नेतृत्वाला जुन्या पदाधिकारी व नेत्यांकडून अपेक्षित राजकीय साथ मिळत नसल्याची कुजबुज कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. दुसरीकडे, पक्षात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या निष्ठावंतांना डावलले जात असल्याची भावना काही कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे मलकापूर काँग्रेसमध्ये नेमके नेतृत्व कोणाचे आणि पक्षाची दिशा कोण ठरवते, हा प्रश्न आता राजकीय चर्चेचा विषय बनला आहे. कधीकाळी जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत रस्त्यावर उतरणारी काँग्रेस, तिचे जुने नवे पदाधिकारी आणि तरुण कार्यकर्ते गेल्या काही महिन्यांपासून पूर्वीइतके सक्रिय का दिसत नाहीत असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये दिसणारी एकजूट कमी झाली आहे का, की अंतर्गत नाराजीमुळे कार्यकर्त्यांमध्येच संभ्रम निर्माण झाला आहे, याची चर्चा शहरात रंगली आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसमधील कथित दोन प्रवाहांची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. एकीकडे निवडणूक स्वतःच्या राजकीय ताकदीवर जिंकून आले असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला जात असल्याची चर्चा आहे तर दुसरीकडे पक्षासाठी वर्षानुवर्षे काम करणारे कार्यकर्ते आणि निष्ठावंत पदाधिकारी यांच्यामुळेच संघटनेची ताकद उभी राहते, असा सूर ऐकायला मिळत आहे. 'आम्ही आमच्या बळावर' आणि 'आम्ही पक्षासाठी' या दोन भूमिकांमधील संघर्षाचा फटका अखेर पक्षाच्या संघटनेला बसत आहे का हा प्रश्न आता मलकापूरच्या राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे तहसील चौकातील बॅनरवर नगराध्यक्षांचा फोटो नसणे ही बाब त्यामुळे केवळ फोटोपुरती मर्यादित न राहता त्यामागील राजकीय अर्थ शोधण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. फोटो का टाळण्यात आला, याबाबत संबंधितांकडून अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नसले तरी या एका घटनेने काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणावर नव्याने चर्चा सुरू केली आहे. मलकापूर काँग्रेसमध्ये जुने आणि नवे नेतृत्व एकत्र येऊन संघटन मजबूत करणार की अंतर्गत मतभेद आणखी तीव्र होणार, याकडे आता कार्यकर्त्यांसह शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

---

## डॉ. अमोल कोल्हे यांची सत्यशोधक समाज संघाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली सदिच्छा भेट

### चाळीसगावात महात्मा फुले स्मारकाला अभिवादन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** महाराष्ट्रभूषण तथा शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे सध्या 'वारसा मराठी' या यूट्यूब चॅनेलवरील भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका व शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित मालिकेत राष्ट्रपिता सत्यशोधक महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका प्रभावीपणे साकारत आहेत. या पार्श्वभूमीवर चाळीसगाव येथे सत्यशोधक समाज संघाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. अमोल कोल्हे यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले यांच्या स्मारकाला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. कोल्हे यांचे पुष्पगुच्छ तसेच महात्मा फुले लिखित 'गुलामगिरी' हा ऐतिहासिक ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले.

'सावित्रीबाई जोतिराव फुले' मालिकेच्या प्रचार-प्रसाराबाबत चर्चा या भेटीदरम्यान 'सावित्रीबाई



जोतिराव फुले' या ऐतिहासिक मालिकेच्या प्रचार आणि प्रसाराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा ऐतिहासिक मालिकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. जळगाव जिल्ह्याच्या वतीने या मालिकेच्या प्रसारासाठी शक्य तेवढे अर्थसहाय्य व सहकार्य करण्याचे आश्वासन सत्यशोधक समाज संघाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती यावेळी सामाजिक कार्यकर्ते धर्मराज पुंडलिक पाटील, महाराष्ट्र प्रभारी सत्यशोधक विधीकर्ते भगवान रोकडे, सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील, उपाध्यक्ष कैलास जाधव, चाळीसगाव तालुकाध्यक्ष भगवान बोरसे, एरंडोल येथील सत्यशोधक विधीकर्ते शिवदास महाजन, प्रा. पंकज पाटील, पद्मिनी माळी, हेमांगी महाजन यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचा प्रभावी प्रचार-प्रसार करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरली.महाराष्ट्रभूषण तथा शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे सध्या 'वारसा मराठी' या यूट्यूब चॅनेलवरील भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका व शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित मालिकेत राष्ट्रपिता सत्यशोधक महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका प्रभावीपणे साकारत आहेत.

---

## वनविभागाच्या जमिनीवर गांजाची शेती उद्ध्वस्त; ८२.५० लाखांचा ३३० किलो गांजा जप्त

### कपाशी-तुरीच्या पिकाआड 'पुष्पा स्टाईल' गांजा लागवड

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर, धुळे (प्रतिनिधी):** शिरपूर तालुक्यातील चिलारे परिसरात वनविभागाच्या जमिनीवर कपाशी आणि तुरीच्या पिकामध्ये करण्यात आलेली गांजाची शेती शिरपूर तालुका पोलिसांनी उद्ध्वस्त केली. पोलिसांनी कारवाईत ८२ लाख ५० हजार रुपये किमतीचा सुमारे ३३० किलो गांजा जप्त केला असून, या प्रकरणी दीपक अभिमान पावरा (वय ४२, रा. चितारे, शिरपूर) याला ताब्यात घेतले आहे. त्याचा एक साथीदार मात्र फरार झाला आहे. तीन दिवसांत गांजाविरोधात दुसरी मोठी कारवाई शिरपूर तालुक्यात तीन दिवसांपूर्वीच थाळनेर पोलिसांनी सुमारे ९३ लाख रुपये किमतीची गांजाची शेती उद्ध्वस्त केली होती. ही कारवाई ताजी असतानाच शिरपूर तालुका पोलिसांनी पुन्हा मोठी कारवाई करून गांजाची शेती उद्ध्वस्त केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. अल्पावधीत दोन मोठ्या कारवाया झाल्याने "शिरपूर तालुका गांजा शेतीचा हब बनतोय



का?" असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. दुर्गम भागातील वनजमिनीवर गांजाची लागवड शिरपूर तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या चिलारे परिसरात वनविभागाच्या जमिनीवर गांजाची लागवड करण्यात आल्याची गुप्त माहिती शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी विविध पथके तयार केली. त्यानंतर चिलारे परिसरात छापा टाकून कपाशी व तुरीच्या पिकामध्ये लपवून करण्यात आलेली गांजाची लागवड शोधून काढण्यात आली. पोलिसांनी गांजाची झाडे व तयार गांजा असा मोठा मुद्देमाल जप्त करत शेती उद्ध्वस्त केली. पूर्वीही मोठ्या कारवाया; गांजामुक्त तालुक्याची मागणी शिरपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून जिल्हा पोलीस दलासह मुंबईतील पथकांकडूनही गांजाच्या अवैध लागवडीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामुळे तालुक्यात अशा प्रकारची लागवड नेमकी किती प्रमाणात आहे, याचा सखोल शोध घेण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलिसांच्या कारवाया सुरू असतानाच जिल्हा पोलीस दल, वनविभाग आणि कृषी विभागाने संयुक्त पथक तयार करून तालुक्याचे सखोल सर्वेक्षण करावे आणि शिरपूर तालुका गांजामुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

---

## धरणगावच्या विविध समस्यांवर महायुती पदाधिकाऱ्यांची मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील विविध प्रलंबित समस्या आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांबाबत शिवसेना-भाजप महायुतीच्या पदाधिकारी व नगरसेवकांनी नवनिर्वाचित मुख्याधिकारी रोशन राजपूत यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मुख्याधिकारी कार्यालयात झालेल्या या भेटीत शहरातील आरोग्य, स्वच्छता तसेच अतिक्रमणाच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. डासांचा वाढता प्रादुर्भाव; फवारणीची मागणी धरणगाव शहरात सध्या मच्छर तसेच विषारी कीटकांचे प्रमाण वाढले असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. डासांचा वाढता प्रादुर्भाव पाहता शहरात डेंग्यू व इतर आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली असून, तातडीने औषध फवारणी आणि स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली. कोरोना काळात शहरात वेळोवेळी धूर फवारणी करण्यात येत होती. त्यासाठी



वापरण्यात येणारे मशीन सध्या कुठे आहे, याचीही चौकशी करून उपलब्ध साधनसामग्रीच्या माध्यमातून तात्पुरत्या स्वरूपात धूर फवारणी सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. आधुनिक फवारणी मशीन उपलब्ध होईपर्यंत नगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर करून फवारणी, स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, जेणेकरून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

शिवाजी महाराज स्मारक परिसरातील अतिक्रमणाचा प्रश्न धरणगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात लोडगाडीधारकांकडून नियमितपणे अतिक्रमण केले जात असल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला. सायंकाळी सहा वाजेपासून रात्री नऊ-दहा वाजेपर्यंत या परिसरात मोठ्या प्रमाणात लोडगाड्यांचा गराडा असतो. त्यामुळे पादचाऱ्यांना चालणेही कठीण होत असून, चारचाकी वाहनांना मार्ग काढणेही अवघड होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी स्वतंत्र अतिक्रमण पथकाची स्थापना करून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात या परिसरात पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी नियमित कारवाई व देखरेख ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. नागरिकांच्या समस्यांवर तातडीने कार्यवाहीची अपेक्षा शहरातील स्वच्छता, आरोग्य, अतिक्रमण आणि इतर विविध नागरी समस्यांबाबत मुख्याधिकारी रोशन राजपूत यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली

---

## धुळे जिल्ह्यातील गुटखा रॅकेट कधी उध्वस्त करणार?

### आरोग्य वाचविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा; उबाठाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** धुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सर्रासपणे सुरू असलेल्या गुटखा, सुगंधित तंबाखू, मावा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्री आणि तस्करीविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील गुटखा रॅकेटच्या मुळाशी जाऊन कारवाई करावी, अशी मागणी करत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर केले. यावेळी "धुळे जिल्ह्यातील गुटखा रॅकेट कधी उध्वस्त करणार?" असा थेट सवाल शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी



उपस्थित केला. गुटख्याची सर्रास विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आणून देण्यासाठी निवेदनासोबत गुटख्याचे पाकीटही पोलीस प्रशासनाकडे सादर करण्यात आल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. तरुणांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न धुळे शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये गुटखा, सुगंधित तंबाखू, मावा तसेच इतर प्रतिबंधित व व्यसनजन्य पदार्थांची अवैध तस्करी, साठवणूक आणि विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. या अवैध व्यवसायामुळे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नसून तरुण पिढीच्या आरोग्यावर आणि कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावरही गंभीर परिणाम होत असल्याचे शिवसेना उबाठाने म्हटले आहे. गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, ओरल सबम्युकोस फायब्रोसिस (OSMF), तोंड उघडण्याची क्षमता कमी होणे तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे गुटख्याचा प्रश्न हा केवळ अवैध व्यवसायाचा नसून सार्वजनिक आरोग्य आणि भावी पिढीच्या भवितव्याशी संबंधित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. "थातूरमातूर कारवाई नको, तस्करांच्या मुळाशी पोहोचा" गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरोधात वेळोवेळी कारवाई होत असली तरी अवैध पुरवठा करणारी साखळी, मोठे साठे, वाहतूकदार, वितरक आणि प्रमुख पुरवठादार यांच्यावर अपेक्षित कठोर व सातत्यपूर्ण कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये असल्याचे शिवसेनेने म्हटले आहे. "तात्पुरती कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. गुटखा तस्करांच्या मुळाशी पोहोचून संपूर्ण पुरवठा साखळी उद्ध्वस्त करणे गरजेचे आहे. वर्षभर पुरेल इतका साठा तस्करांनी करून ठेवला असल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचावे," अशी मागणी करण्यात आली. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना आवाहन धुळे जिल्ह्यातील खासदार, पालकमंत्री, आमदार आणि सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून नागरिकांच्या आरोग्यासाठी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवसेना उबाठाने केले आहे.

---

## मलकापूरात बॅनर फाडण्यावरून राजकीय वातावरण तापले!

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर | प्रतिनिधी :** शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक उपक्रमांच्या निमित्ताने लावण्यात येणाऱ्या बॅनरची तोडफोड अथवा फाडण्याच्या प्रकारावरून मलकापूरच्या राजकीय वर्तुळात नाराजीचा सूर उमटू लागला आहे. बॅनर फाडण्याच्या घटनांमुळे संबंधित कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये तीव्र नाराजी असून, अशा प्रकारांमुळे राजकीय संस्कृतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी विविध कार्यक्रम, वाढदिवस, शुभेच्छा तसेच सामाजिक व राजकीय उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर बॅनर लावले जातात.

मात्र, काही ठिकाणी लावण्यात आलेले बॅनर फाडले जात असल्याचे प्रकार समोर येत असल्याने राजकीय वातावरणात चर्चेला उधाण आले आहे.

"बॅनर फाडून कोणाचेही कार्य संपत नाही!" या प्रकारावर प्रतिक्रिया व्यक्त करताना संबंधित समर्थकांकडून संतप्त भावना व्यक्त करण्यात येत आहेत. "बॅनर फाडून कोणाचेही कार्य संपत नाही. समाजासाठी केलेले काम कागदावर किंवा बॅनरवर नसते, ते जनतेच्या मनात असते. त्यामुळे बॅनर फाडणाऱ्यांनी ही बाब लक्षात ठेवावी," असा थेट संदेश देण्यात आला आहे. त्यामुळे प्रचार साहित्याची तोडफोड करून राजकीय प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न उलट संबंधितांमध्ये अधिक नाराजी निर्माण करू शकतो, अशी चर्चा शहरात रंगली आहे. राजकीय स्पर्धा विचारांची असावी! राजकीय स्पर्धा ही विचारांची, विकासकामांची आणि जनसेवेची असावी; वैयक्तिक द्वेषातून प्रचार साहित्याची तोडफोड करण्याची नव्हे, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

वस्तू विकत घेण्यापूर्वी किंवा पाहण्यापूर्वी त्या वस्तूचे आगावू पैसे देण्याची भारतीय ग्राहकांची मानसिकता नाही. हीच मानसिकता ओळखून इ-कॉमर्सवाल्यांनी कॅश ऑन डिलिव्हरीचा पर्याय ग्राहकांसमोर ठेवला आणि तो यशस्वी ठरला. यारितीने कंपनीवरचा विश्वास वाढण्यास हातभार लागला. एखाद्या वस्तूने समाधान झाले नाही तर ती वस्तू परत करण्याच्या पर्यायामुळे ग्राहकराजा दुकानात जाण्यापेक्षा ऑनलाइनवरच आपल्याला हवी असलेली वस्तू मागविण्यास प्राधान्य देऊ लागला आहे. कॅश ऑन डिलिव्हरीची लोकप्रियता वाढण्यामागे आणखी काही कारणे आपल्याला सांगता येतील.

# कॅश ऑन डिलिव्हरीचा फंडा

**इ-कॉमर्सवरील व्यवहार लोकप्रिय होण्यात कॅश ऑन डिलिव्हरी (सीओडी) हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरला आहे. ऑनलाइन शॉपिंगकडे ग्राहकांचा ओढा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आवडती वस्तू घरबसल्या विकत घेण्याची सोय उपलब्ध झाल्याने आणि ती वस्तू हातात पडल्यानंतरच पैसे देण्याची सुविधा असल्याने साहजिक इ-कॉमर्स वेगाने वाढत चालले आहे. एवढेच नाही तर आपल्या लाडक्या टपाल खात्यालाही कॅश ऑन डिलिव्हरीमुळे कोट्यवधींचा फायदा झाला आहे. २०१५-१६ या आर्थिक वर्षात टपाल खात्याने १३०० कोटींची उलाढाल केली. २०१३-१४ मध्ये ही उलाढाल केवळ शंभर कोटींपर्यंत पोचलेली होती. टपाल खात्याने स्नॅपडिल, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, येपमी, शॉपक्लूझ या इ-कंपन्यांशी करार केले असून त्यांची ऑर्डर पुर्ण करण्याची जबाबदारी पोस्टाने उचलली आहे. ग्राहकांना देखील कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून व्यवहार करणे अधिक श्रेयस्कर आणि विश्वासार्ह वाटते.**

▶ पैसे देण्याचे पर्याय कमी : भारत हा जगातील तिसरी आर्थिक महासत्ता असल्याचे म्हटले जात असले तरी अजुनही गरिबीची रेषा आर्थिक विषमतेचे वास्तव दाखवते. बँकांकडून ग्राहकांना डेबिट किंवा क्रेडिट कार्ड देण्यासाठी चढाओढ सुरू असली तरी त्याचा वापर होतोच असा नाही. ज्यांच्याकडे हे कार्ड आहेत, ते ऑनलाईन शॉपिंगसाठी वापरतीलच याची शाश्वती देता येत नाही. कारण कार्ड पेमेंट करण्याची प्रक्रिया खूपच किचकट असल्याने ग्राहक अशा मार्गाने पैसे भरण्याचे टाळतोच. तेव्हा कॅश ऑन डिलिव्हरी हा पर्याय सोपा असल्याने ग्राहकांनी वस्तू मागविताना या पर्यायाला अधिक पसंती दिली.

▶ वस्तूची खात्री आणि समाधान : ग्राहकमंडळी कोणतीही वस्तू विकत घेताना दहा वेळेस चाचपडून पाहतो. पैसे देताना ती वस्तू त्या पैशाचा मोबदला पूर्ण करते का नाही, याची चाचपणी ग्राहक करत असतो. अशा वेळी एखादी वस्तू खराब किंवा कालबाह्य असल्याचे निदर्शनास आले तर ग्राहक ती वस्तू परत देण्यासाठी मागेपुढे पाहत नाही आणि बदल्यात अन्य वस्तू पदरात पाडून घेतो. कॅश ऑन डिलिव्हरीच्या वेळी ग्राहकही त्या वस्तूची खात्री पटल्यानंतर आणि समाधान झाल्यानंतरच पैसे कुरियर प्रतिनिधीकडे सुपूर्द करतो. उदा. एखादा मोबाईल मागविल्यानंतर तो मोबाईल सुरू करून तो व्यवस्थित आहे का नाही, हे आपण पाहतो. तसेच कागदपत्रांची पूर्तता योग्य तऱ्हेने केली आहे की नाही, हे ही पाहतो. या सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर पैसे देण्यास ग्राहकराजा राजी होतो.



▶ गैरव्यवहाराची धास्ती : ऑनलाइन शॉपिंग आणि इ-कॉमर्सवरून व्यवहार करण्याची पद्धत लोकप्रिय होत चालली आहे. मात्र अजुनही काही ग्राहकांच्या मनात अशा व्यवहाराबाबत धास्ती वाटते. एखादी वस्तू मागविताना त्याचे आगाऊ पैसे भरले तर ती वस्तू मिळेपर्यंत मनात कायम धाकधूक राहते. कधी कधी ते पैसे बुडाल्याचीच भावना ग्राहकांच्या मनात निर्माण होते. त्यामुळे व्यवहारात कोणतीही शंका राहू नये यासाठी कॅश ऑन डिलिव्हरी हा पर्याय खुला ठेवला आणि त्यास पसंती दिली. आपल्या इनबॉक्समध्ये असंख्य प्रकारचे मेल येत असतात. त्यात फसवे देखील असतात. काही ग्राहक अशा फसव्या मेलला किंवा एसएमएसला बळी पडतात. अशा घटना वाचनात, पाहण्यात आल्याने ऑनलाइन व्यवहाराबाबत अनामिक भिती, धास्ती बसलेली असते. तेव्हा घरी वस्तू आल्यावरच पैसे देऊ अशी खूणगाठ ग्राहक मनाशी बांधतात.

▶ भारतीयांची मानसिकता : सुईपासून ते फ्लॅट खरेदीपर्यंतच्या व्यवहारात भारतीय ग्राहकाची भूमिका चोखंदळ आणि चौकस अशीच असते. प्रत्येक गोष्ट समजावून घेताना त्यातील बारकावे, कच्चे दुवे, उपयोगिता, भविष्यातील परतावा आदी गोष्टींचा विचार करून ग्राहक व्यवहार करतात. फळभाज्या विकत घेताना देखील ग्राहक घासाघिस करतात. इलेक्ट्रॉनिक दुकानात देखील वस्तू खरेदी करताना दुकानदाराकडून बेस्ट प्राइस पदरात पाडून घेतात. अशा स्थितीत ऑनलाइन शॉपिंगमध्ये अन्य करांचा समावेश नसल्याने अगोदरच वस्तूची किंमत कमी आणि वाजवी असते. त्यामुळे तेथे घासाघीस करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. फक्त ती वस्तू हातात पडल्यानंतर आपल्याला अपेक्षित असणारी ती हीच वस्तू आहे का, याचे समाधान झाले तरच तो ग्राहक पुढील व्यवहार करतो. भारतीय ग्राहकांच्या मानसिकतेला कॅश ऑन डिलिव्हरी पूरेपूर उतरली आहे.

▶ वाढती स्पर्धा : ई-कॉमर्समध्ये अनेक नामांकित कंपन्या उतरल्यामुळे ग्राहकांना आपल्याकडे खेचण्याची स्पर्धा लागलेली आहे. ग्राहकांनी आपल्याच कंपनीमार्फत व्यवहार करावेत, वस्तू खरेदी करावेत यासाठी संबंधित कंपन्या विविध ऑफर्स, पर्याय देत असतात. एकावर एक फ्रि, कॅशबॅक ऑफर्स, इएमआय ऑफर्स, दुसऱ्या व्यवहारावर ५० टक्के फ्री यासारख्या ऑफर्सचा भडिमार ग्राहकांवर सुरू असतो. याच ऑफर्सच्या तोडीस तोड असणारी कॅश ऑन डिलिव्हरी हा पर्याय देखील ग्राहकांना पसंत पडला आहे. अर्थात कॅश ऑन डिलिव्हरीच्या वेळी डिलिव्हरी बॉयला पैसे द्यावेच असे नाही तर कार्ड पेमेंटही करू शकतो. हा पर्याय खूपच सोपा असल्याने ग्राहकांना कॅश ऑन डिलिव्हरीचे व्यवहार डोक्याला ताप न देणारा ठरू लागला आहे.

## ‘सीओडी’चा विक्रेत्यावर परिणाम

▶ सीओडीमुळे ग्राहक निर्धास्तपणे व्यवहार करत असले तरी हा व्यवहार पूर्ण होईपर्यंत आणि ग्राहकांचे समाधान होईपर्यंत विक्रेत्याचा जीव टांगणीला लागलेला असतो. कारण ग्राहकांची मानसिकता कधी बदलेल हे सांगता येत नाही. आठ दिवसांपूर्वी ऑर्डर दिलेला माल हातात पडल्यानंतर तो पसंतच पडेल याची हमी देता येत नाही. म्हणून विक्रेत्यांनाही या व्यवहाराची धास्ती असते.

▶ वस्तू परत करण्याची भीती : कॅश ऑन डिलिव्हरीच्या पर्यायामुळे ग्राहक जर वस्तू आवडली नाही तर ती वस्तू परत करतो आणि दुसऱ्यांदा त्या वस्तूची ऑर्डर देईलची हे सांगणे कठिण असते. अशा स्थितीत माल पाठविणे, तो परत आणणे यात बराच वेळ आणि पैसा हा विक्रेत्याचा खर्च होत असतो. घरापर्यंत माल पोचविल्यानंतर तो उतरवला गेला नाही तर विक्रेत्यांना हकनाक मनस्ताप सहन करावा लागतो. कधी कधी घराला कुलूप असते, ग्राहक गावाला गेलेला असतो, परत या असेही निरोप दिले जाते, यादरम्यान डिलिव्हरी बॉयला कसरत करत माल ग्राहकांपर्यंत पोचवणे ही एकप्रकारची कसोटीच असते. अर्थात वस्तूचा आगावू रक्कम घेतलेली नसल्याने माल हातात पडेपर्यंत सर्व गुंतवणूक विक्रेत्यालाच करावी लागते.


▶ चोरीस जाण्याची भीती : एकावेळी अनेक ऑर्डर पूर्ण करताना डिलिव्हरी बॉयजवळ वस्तू आणि पैसे बऱ्याच प्रमाणात असतात. अशा वेळी वस्तू गहाळ होण्याची आणि पैसे चोरीस जाण्याची शक्यता असते. सणासुदीला किंवा व्हॅलेंटाईन डे, मदर्स डे यासारख्या दिवसाला वस्तुंची मागणी वाढलेली असते. कधी कधी डिलिव्हरी बॉयला रात्री उशिरापर्यंत ग्राहकांची मागणी पूर्ण करावी लागते. अशा वेळी विक्रेत्याला माल संपेपर्यंत आणि कॅश पदरात पडेपर्यंत चैन पडत नाही. ग्राहकांसाठी ‘सीओडी’ ही गोष्ट सहज वाटत असली तर विक्रेत्याला मात्र ती कधी कधी मनस्ताप देणारी ठरू शकते.

▶ वेळखाऊपणा: ‘सीओडी’ साठी थर्ड पार्टी सेवा वापरली जात असेल तर प्रत्यक्षात हातात पैसे पडेपर्यंत वेळ खूप जातो. पैसे वसूल करण्यासाठी बराच काळ जावू द्यावा लागतो. अशा वेळी विक्रेत्याचा, कंपनीचा पैसा अडकून पडलेला असतो. तो मिळेपर्यंत कंपनीला बऱ्याच प्रक्रियेतून जावे लागते.

बँकेच्या दैनंदिन उलाढालीत नवनवीन संकल्पना आणि यंत्रणा कार्यान्वित होत असल्याने ग्राहकांच्या व्यवहाराला वेग आला आहे. पूर्वी एका बँकेतून दुसऱ्या बँकेत रक्कम हस्तांतरीत करायचे असेल तर चार-पाच दिवस लागत होते. परगावी असेल तर आठ-पंधरा दिवस लागायचे. आता मात्र पापणी लवण्याच्या आताच तुम्हाल पैसे ट्रान्फसर झाल्याचा एसएमएस येतो. चेक क्लिअरिंग असो किंवा आरटीजीएस, एनएफटी सारख्या पद्धतीत आमुलाग्र बदल झाल्याने ग्राहकांचे व्यवहार अत्यंत सुटसुटीत आणि सोपे झाले आहे. बँकेत रांगेत उभा राहण्याचा वेळही कमी झाला आहे. अशाच लोकप्रिय पद्धतीची माहिती घ्यायची असेल आरटीजीएसची घेता येईल.

# आरटीजीएसच्या अंतरंगात

आरटीजीएस (रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट) पद्धत सर्वसाधारणपणे देशातील केंद्रीय बँकाकडून वापरली जाते. मोठे व्यवहार आरटीजीएसमार्फत सुरक्षितरित्या केले जातात. आरटीजीएस ही एक आर्थिक व्यवहाराची अशी पद्धत आहे की त्यात एक बँकेतून दुसऱ्या बँकेत आर्थिक हस्तांतरण होता वास्तविक वेळेत व्यवहार होतात. रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या वेळेतच अशा प्रकारचे व्यवहार पूर्ण होतात. शक्यतो त्याचवेळेला देवाणघेवाणीची प्रक्रिया पूर्ण व्हावी अशी अपेक्षा असते. परंतु कधी कधी तांत्रिक बिघाडामुळे आरटीजीएसला वेळ लागतो. परंतु काही वेळाने का होईना त्याच दिवशी व्यवहार पूर्ण होतो.




### ‘रिअल टाइम’ म्हणजे काय?

आरटीजीएस प्रणालीत रिअल टाइमचा उल्लेख करण्यात आलेला आहे. व्यवहाराची सूचना मिळताच त्या वेळेत पूर्ण केलेला व्यवहार म्हणजे रिअल टाइम असे म्हटले जाते. रिझर्व्ह बँकेकडून आरटीजीएस प्रणालीचा प्रथम वापर करण्यात आला. यामार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अन्य बँकेत किंवा खात्यात पैसे ट्रान्सफर करणे सोपे झाले. या प्रणालीच्या माध्यमातून ग्राहकांना, कंपनीला किंवा संस्थेला कमीत कमी दोन लाख रुपये ट्रान्सफर करता येतात तर अधिकाधिक कोणतीही मर्यादा नाही. त्यामुळे ग्राहकांना किंवा कंपनीला बँकेत कॅश जावून भरण्याची गरज उरली नाही. ऑनलाइनपद्धतीने पैशाची देवाण घेवाण करणे शक्य झाले. एवढी रक्कम सांभाळणे आणि बाळगणेही जिकरीचे असल्याने एखादा ग्राहक या प्रणालीचा बँकेमार्फत उपयोग करू शकतो.

### आरटीजीएस प्रणालीची वेळ:

रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या वेळेत आरटीजीएसचे व्यवहार केले जातात. सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते दुपारी साडेचार वाजेपर्यंत आरटीजीएसमार्फत व्यवहार केले जातात. त्याचबरोबर पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारीही तीच वेळ लागू असणार आहे. दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशी आरटीजीएसचे व्यवहार बंद असतात. प्रत्येक बँकेची आणि शाखेची कामाकाजाची वेळ वेगळी असते.

काही बँका रविवारी सुरू असतात तर काही बँका सायंकाळी सात वाजेपर्यंत सुरू असतात. अशा बँकांचे आरटीजीएस व्यवहार हे शक्यतो दुसऱ्या दिवशी पूर्ण होतात. कारण रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ही प्रणाली काम करते. त्याचबरोबर नियमित सकाळी उघडणारी बँक ही दुपारी बंद होण्यापूर्वी अर्धा ते एक तास अगोदर आपले व्यवहार बंद करते. त्यावेळेत आपण आरटीजीएससाठी पैसे भरले तर त्याचवेळी ते पैसे हस्तांतरण होतीलच याची खात्री देता येत नाही. सकाळी शाखा सुरू झाल्यानंतर पैसे भरले तर ते सायंकाळपर्यंत किंवा काही वेळातच पैसे जमा होतात.

### वेळखाऊ हस्तांतर

आरटीजीएसमार्फत रक्कम ट्रान्सफर करायची असेल तर रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार ती रक्कम अर्धा तासात जमा व्हावी, अशी अपेक्षा बाळगली आहे. परंतु त्या वेळेतच पैसे जमा होतील, हे सांगणे कठिण आहे. तांत्रिक अडचण, प्रणालीला क्लिअरिंगसाठी लागणारा वेळ, यंत्रणेवर पडणारा ताण आदी गोष्टी लक्षात घेऊन या व्यवहारात कधी कधी वेळ जातो.असे असले तरी काही प्रमाणात या प्रणालीमुळे आर्थिक उलाढालीत वेग आला आहे. मात्र पैसे जमा करण्याची वेळ आणि संबंधित बँकेची पैसे स्वीकारण्याची वेळ यात ताळमेळ असणे आवश्यक आहे. दोन्ही वेळेत फरक असल्यास व्यवहाराची गती मंदावते. कधी कधी खातेक्रमांक चुकीचा टाकल्यानंतर नव्याने प्रक्रिया करण्यासही बराच वेळ जातो. त्यामुळे कर्मचारीवर्गही गोंधळून जातो. पैसे जमा करण्याची वेळ आपण आरबीआयच्या धोरणानुसार पाळली तर व्यवहार पूर्ण करण्यासाठी कोणतिही अडचण येत नाही.

# क्रेडिट कार्डचा स्मार्ट वापर

क्रेडिट कार्डचे कितीही फायदे असले तरी संपूर्णपणे त्यावर अवलंबून व्यवहार करणे जोखमीचे ठरू शकते. क्रेडिट कार्डचे अव्वाच्या सव्वा येणारे बिल हे आपल्याला मानसिक धक्का देणारे ठरू शकते. जर वेळेत बिल भरले नाही तर आकारण्यात येणारा दंडही तो आपल्या कुवतीबाहेरचा असतो.

क्रेडिटकार्डमुळे आपण कधी कधी भरमसाठ खरेदी करतो, परंतु जेव्हा बिल भरण्याची वेळ येते तेव्हा आपला हिशोब गडबडून जातो. त्यामुळे क्रेडिट कार्डचा वापर जपून आणि सांभाळूनच केला पाहिजे. त्यासाठी काही गोष्टी येथे नमूद करता येतील.

क्रेडिट कार्ड घेण्यापूर्वी कंपनीच्या अटी आणि शर्तींचे काळजीपूर्वक वाचन केले पाहिजे किंवा एजंटाकडून माहिती घेतली पाहिजे. कार्डवरील खरेदी केल्यास आकारण्यात येणाऱ्या सर्व्हिस चार्ज, व्याजदर, फायदे आणि रिवार्ड पॉइंटस याची माहिती घेणे गरजेचे आहे. कार्डसोबत असणारी माहितीपुस्तिकेचेही अवलोकन केले पाहिजे.

ग्राहकांनी शक्यतो एकच क्रेडिट कार्डचा वापर करण्यावर भर द्यावा. दोन तीन कार्डावरून खरेदी केल्यास बिल भरताना दमछाक होण्याची शक्यता असते. एकाच कार्डामुळे व्यवहार मर्यादित राहतो आणि बिल भरण्यासही अधिक ताण द्यावा लागत नाही. अनेक कार्डांमुळे खरेदी कधी कधी नियंत्रणाबाहेर जाण्याची स्थिती निर्माण होते. रिवार्ड पॉइंटसही जाणून घ्यावेत. जेणेकरून मुदतीच्या आत ते रिडिम करून त्याचा फायदा घेता येईल.

प्रत्येक खरेदीसाठी क्रेडिट कार्डचा वापर करणे टाळले पाहिजे. दररोज लागणाऱ्या वस्तु, किराणा सामान, कपडे आदींच्या खरेदीसाठी क्रेडिट वापरण्याऐवजी डेबिट कार्डचा वापर करावा किंवा रोख रक्कम मोजावी.

दररोज क्रेडिट कार्डचा वापर केल्यास बिलाची रक्कम वाढत जाते आणि ती रक्कम भरणे कधी कधी जड जावू शकते. त्यामुळे महत्त्वाच्या किंवा महागड्या वस्तुच्या खरेदीसाठीच क्रेडिट कार्डचा वापर करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

मुदतीच्या आत बिल भरणा केल्यास आपल्याला



दंड बसणार नाही. कधी आर्थिक अडचणीमुळे बिल भरणे शक्य झाले नाही तर आकारण्यात येणाऱ्या व्याजाची माहिती करून घेणे महत्त्वाचे ठरते. अन्यथा वाजवीपेक्षा अधिक बिल भरण्याची पाळी आपल्यावर येते. त्याचबरोबर बिल आकारण्याची तारीख कोणती हेही जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

क्रेडिट कार्डवर खर्चाची मर्यादा ठरवून घ्यावी किंवा किती मर्यादा आहे, हे जाणून घ्यावे. दरवर्षी खर्चाच्या मर्यादेत वाढ केली जाते. गरज असेल तरच ती मर्यादा वाढवावी. जेणेकरून अनावश्यक खरेदीला वाव मिळणार नाही. परदेशात जाताना क्रेडिट कार्डची वैधताही तपासून पाहावे, जेणेकरून ऐनवेळी गोंधळ उडणार नाही.

# व्हाउचर कोडचे आकर्षण

*नवीन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी किंवा टिकवण्यासाठी कुपन किंवा व्हाऊचर कोड हे महत्वाचे ठरते. ऑनलाईन किंवा ऑफलाइन खरेदी करताना ग्राहकांसाठी विविध ऑफर्स दिल्या जातात. या ऑफर्स कधी वस्तूच्या रुपाने, कधी रकमेत तर कधी कोडच्या रुपाने दिले जाते. तो कोड वापरला किंवा स्क्रॅच तर किंमतीत काही प्रमाणात सवलत दिली जाते. किंवा अन्य भेटवस्तू ग्राहकांना प्रदान केली जाते. अशाप्रकारच्या ऑफर्समुळे आणि जाहीरातबाजीमुळे ग्राहकवर्ग आपोआप खरेदीकडे ओढला जातो. म्हणूनच व्हाऊचर कोड हे ई कॉमर्समध्ये किंवा मॉलमध्ये असणाऱ्या वस्तुच्या विक्रीसाठी उपयुक्त ठरत आहे.*

*कुपन किंवा व्हाऊचर कोड देण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यात मेलच्या माध्यमातून, मॉलमध्ये, वृत्तपत्रांतून, खरेदी करण्यात येणाऱ्या वस्तूंबरोबर तसेच जाहीरातबाजीतून हा कोड ग्राहकांपर्यंत पोचवला जातो. पिझ्झा स्टोअरवर एकावर एक पिझ्झा फ्रि मिळवण्यासाठी पॉम्प्लेटमध्ये दिलेल्या कोडचा वापर करावा लागतो. हे पॉम्प्लेट घरोघरी वाटप केले जातात. असे कितीतरी मार्ग आपल्याला सांगता येतील.*

कुपन कोड महत्त्वाचे का? : ग्राहकांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि खेचून घेण्यासाठी कुपन कोड महत्त्वाचा मानला जातो. आपल्या वस्तुची खरेदी अधिक व्हावी यासाठी हा एक मार्केटिंग योजनेचा भाग मानला जातो. याशिवाय कोडच्या माध्यमातून दहा टक्के अधिक सवलत प्रदान केली तर स्पर्धेच्या युगात ग्राहक आपल्या संकेतस्थळांना अधिक पसंती देऊ शकतात. कुपन कोड हे ग्राहकांची उत्सुकता वाढवतात. अशा प्रकारे विविध ऑफर्स कुपन देणाऱ्या वस्तुची खरेदी करण्यासाठी ग्राहकही आतूर असतात. सणासुदीच्या काळात, विकएंडला, राष्ट्रीय सणाच्या दिवशी कंपनीकडून अशा प्रकारचे कुपन कोडची ग्राहकांवर एकप्रकारे बरसातच केली जाते. त्यामुळे ग्राहकही न घेणारी वस्तू घेण्यासाठी प्रयत्न करतो. एखादे नवीन प्रॉडक्ट बाजारात आणण्यासाठी आणि त्याचा प्रसार करण्यासाठीही कुपन कोडचा वापर कला जातो.

कुपनचे फायदे : कुपनच्या फायदामुळे ग्राहकांची संख्या वाढतेच त्याचबरोबर ग्राहकांनाही खरेदीबरोबर अतिरिक्त सवलत मिळाल्याचा आनंद मिळतो. पहिल्या खरेदीनंतर दुसऱ्या खरेदीवर ५० टक्के ऑफ दिला जातो. कधी कधी मोठ्या पिझ्झाबरोबर लहान पिझ्झा असतो. तर कधी महागड्या एलईडीबरोबर साऊंड सिस्टिम्स, डिश टिव्ही मोफत दिले जाते. वस्तू नको असेल तर पैसे वजा केले जाते. ही ऑफर्स हवी असेल तर कुपन स्क्रॅच करून त्याप्रमाणात सवलत ग्राहकांना दिली जाते.




काही वेळेस दिल्या जाणाऱ्या कुपन्सची कालमर्यादा निश्चित केली जाते. कधी एक महिना तर कधी सहा महिन्यांची वैधता असते. या वैधतेमुळे ग्राहक कालांतराने का होईना आपले प्रॉडक्ट खरेदीसाठी येते. उदा. काही महिन्यापूर्वी एका चहाकंपनीने ठराविक मुदतीसाठी रिचार्ज कोड कुपन दिले होते. दहा रुपयाच्या रिचार्जचा कोड चहाच्या पुड्यात दिला होता.

कुपन कोड सहजपणे वापरू शकतो. ऑनलाईन खरेदी केली असेल तर संकेतस्थळावर तो प्रोमोकोड किंवा कुपनक्रमांक टाकून ऑफर्सचा लाभ घेऊ शकता. प्रोमोकोड देण्यासाठी आपल्याला शेकडो संकेतस्थळ पाहवयास मिळतील. कुपन मिळवण्यासाठी आणि ती वापरण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ असल्याने ग्राहकांनाही अशी खरेदी करण्याची फारशी कटकट वाटत नाही. मॉल किंवा रिटेलरदेखील कोडची सुविधा तातडीने उपलब्ध करून देत असल्याने ग्राहक कोडसाठी अर्ज करतात. त्याचबरोबर काही रिटेलर कुपनशिवाय आणखी काही सवलत देण्याचा प्रयत्न करतात. तोही फायदा ग्राहकांना मिळतो.

## व्हाऊचर कोडचे तोटे

या व्हाऊचर्समुळे ग्राहकांना भुरळ पडते आणि गरज नसताना आपण कोडचा वापर करून खरेदी करतो. अनेकदा मुळातच कमी रक्कम असताना वाढीव रक्कम करून आणि अन्य गोष्टी सोबत मोफत देऊन एकप्रकारे आपली फसवणूक केल्याचा प्रयत्न केला जातो. कधी कधी कुपन कोडचा उपयोग लगेच होतो असा नाही. काही कंपन्या सवलतीची रक्कम ग्राहकांच्या खात्यात जमा करतात. तोपर्यंत आपल्याला वस्तूची पूर्ण रक्कम भरावी लागते. ऑफर्सची रक्कम मिळण्यासाठी काही वेळा कस्टमर केअरला फोन करून माहिती मिळवावी लागते किंवा दुकानात खेट्या माराव्या लागतात. कधी कधी वैधता संपल्यामुळेही कुपन कोडचा लाभ मिळत नाही. ज्या वस्तूंवर ऑफर किंवा कुपन कोड आहेत, त्याचा दर्जा तपासण्याची आवश्यकता आहे. कालबाह्य झालेल्या गोष्टी ऑफर्स देऊन विकण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचीही काळजी आपण घेतली पाहिजे.